# मूळव्याध

## मूळव्याध म्हणजे काय?

मूळव्याध म्हणजे गुदाशयातील किंवा गुदद्वाराबाहेरील रक्तनलिका सूजलेल्या असणे. कधी कधी ही मूळव्याध गुदद्वारातून वाढते.

## कारणे-

- बध्दकोष्ठता
- वरचेवर किंवा बराच काळ गुदाशयाच्या हालचालीवर ताण पडलेला असणे
- पोटातील दाब वाढणे
- गुदाशय व गुदद्वाराची त्वचा कमकुवत असणे

## चिन्हे आणि लक्षणे-

- गुदद्वाराशी खाज येणे
- गुदाशयात व गुदद्वाराभोवती वेदना
- गुदद्वाराशी पेशींचा फुगवटा येणे
- गुदद्वारातून कडक मल बाहेर टाकला जाणे
- मल-मूत्र विसर्जनावर ताबा नसणे
- गुदद्वाराचा दाह होणे

## निदान-

- मुळव्याधीचे निदान करण्यासाठी संपूर्ण मोठया आतडयाची तपासणी करणारी डिजिटल रेक्टल एक्झाम ही चाचणी केली जाते.
- गुदद्वारातून नळी घालून (analscopy) मूळव्याधीची चाचणी होते.
- मोठया आतडयाची तपासणी

## उपचार-

- औषधांमुळे वेदना आणि सूज कमी होते आणि गुदाशयाचे कार्य सुरळितपणे सुरु राहते. औषध गोळया, पॅड, क्रिम किंवा मलम या स्वरुपात असते.
- **जीवनशैलीतील बदल गरजेचा आहे.**
- कॉर्टीकोस्टेरॉइड मलम
- वेदनादायी मूळव्याधीवर उपचार म्हणून बधिर करणारी औषधे देतात.
- मुळव्याध कमी करण्यासाठी किंवा काढून टाकण्यासाठी शस्त्रक्रिया करतात.




## रुग्ण समुपदेशन-

- गुदाशयाच्या हालचालीवर ताण येऊ देऊ नये किंवा फार वेळ मलविसर्जनास लावू नये.
- बध्दकोष्ठता टाळा आणि गुदाशश्च्या हालचाली सहज होतील याकडे लक्ष द्या.
- चालण्यासारख्या व्यायामाने गुदाशयाच्या हालचाली सुलभ होतात.
- पुरेसे पाणी व इतर द्रवपदार्थ प्यावे.
- वेदना होत असल्यास बर्फाने शेकवावे.
- गुदद्वार स्वच्छ ठेवावे.

Reference: Micromedex's Care Notes System Online 2.0